# - प्रेस नोट -

दि. १९/०६/२०२६

## आर.सी.एफ पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. १६/०६/२०२६ रोजी १७.२० वा. च्या सुमारास फिर्यादी सनी रवी पाटील वय-३० वर्षे, धंदा -मजुरी, रा. ठी. चेबुंर, मुंबई, हे अशोक नगर येथील रामराज हॉटेल, जवळील पानटपरी, चेबुंर, मुंबई, येथे बसले असताना अटक आरोपी पुरुष वय-२३ वर्षे, याने जुन्या भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ केली तसेच फिर्यादी यांना ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्या कडे असलेल्या तलवारीने फिर्यादी यांच्या मानेवर वार केला त्यावेळी फिर्यादी यांनी स्वत:ला वाचवण्याचा प्रयत्न करत असताना तलवारीचा वार फिर्यादी यांच्या मानेच्या बाजुला डाव्या खांदयावर लागल्याने फिर्यादी यांना गंभीर दुखापत झाली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.१८/०६/२०२६ रोजी गु.र.क्र.३९८/२६, कलम १०९(१),३५१(२),३५२ बीएनएस २०२३ सह कलम ४,२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------